प्रकरण ३ रे

# गोपाळ गणेश आगरकर

१) प्रारंभिक जीवन
२) सामाजिक कार्य

## १) प्रारंभिक जीवन :-

आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीच्या इतिहासात गोपाळ गणेश आगरकर यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांना फक्त ३९ वर्षांचे आयुष्य लाभले. या अल्पकाळात त्यांनी सामाजिक व धार्मिक प्रश्नांसंबंधी चिंतन करून आपले विचार मांडले. 'सुधारक' या पत्रातून त्यांनी सामाजिक व धार्मिक प्रश्नांवर विचार मांडून महाराष्ट्राचे फार मोठे वैचारिक प्रबोधन केले. **आचार्य जावडेकरांनी** 'सर्व आयुष्यभर तीव्र विरोधाची, निंदेची पर्वा न करता समाजसुधारणेची पताका राबवणारे आगरकर' या शब्दात त्यांचा गौरव केला आहे. **न्या. प्र. बा. गजेंद्रगडकर** यांच्या मते, 'पुरोगामी बुद्धिवाद, सर्वांगीण व सर्वदर्शी प्रवृत्ती याबाबत आगरकर हे महाराष्ट्रातील बुद्धिवादाचे प्रमुख व प्रथम आचार्य होते' असे म्हटले. **न. र. फाटक यांच्या मते,** 'आगरकरांनी निर्भयपणे महाराष्ट्राला आपले विचार सांगितले. महाराष्ट्रात सार्वजनिक सेवेचा नवा स्वावलंबी संप्रदाय स्थापन करण्याचा मान आगरकरांना आहे.' **गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात,** 'विद्वान पंडित, कळकळीचा देशभक्त, निर्भय व जोरदार शीलाचा पुरुष म्हणजे आगरकर. त्यांच्यासारखी माणसे कित्येक वर्षांत एखाद्या वेळी जन्मास येतात म्हणून त्यांचा मृत्यू राष्ट्रीय आपत्ती ठरते.' **मे. पुं. रेगे म्हणतात,** 'आगरकर हे विवेकवादाचा संत होते.' आचार्य जावडेकरांना आगरकर हे जहाल उदारमतवादी आहेत असे वाटत होते तर दि. के. बेडेकर आगरकरांना जहाल सुधारक म्हणतात. **'ज्ञानप्रकाश' (पुणे) या नावाच्या तत्कालीन साप्ताहिकाने म्हटले होते,** 'आगरकरांनी सामाजिक सुधारणेची एकेक बाब हाती घेऊन इतक्या सुंदर भाषेत विवेचन केले की, सुधारणाविरुद्धच्या पक्षाचे लोक, सुधारकसुद्धा या आगरकरांच्या पत्रांची प्रतीक्षा करीत असत.' 'टिळक-आगरकरांत तीव्र मतभेद झाले तरी टिळक हे आगरकरांवर मृत्युलेख लिहिताना घळघळा रडत होते व दोन कॉलमांचा लेख लिहिताना उमाळ्यांच्या अडथळ्यामुळे त्यांना चार तास लागले' असे **न. चिं. केळकर यांनी 'टिळक चरित्र खंडा'मध्ये लिहिले आहे,** 'टिळकांच्या आगरकरांवरील मृत्युलेखातून त्यांच्या मनातील आगरकरांबद्दलचे निस्सीम प्रेम, आदरभाव स्पष्ट होतो.'

**आगरकरांचा जीवनपट :-** गोपाळ गणेश आगरकरांचा जन्म १४ जुलै १८५६ रोजी कऱ्हाडजवळ टेंभू या गावी झाला. प्राथमिक शिक्षण कऱ्हाड येथे तर पुढील शिक्षण रत्नागिरी व अकोला येथे झाले. घरच्या गरिबीमुळे शिक्षणाच्या काळात कारकून, कंपाऊंडर म्हणून त्यांनी काम केले. विद्यार्थीदशेत निबंध स्पर्धेत बक्षिसे मिळवून व 'वऱ्हाड समाचार'मध्ये नियमित लेख लिहून त्यांना उपजीविका करावी लागली. इ.स.१८७८ मध्ये ते बी. ए. पास झाले तेव्हाच त्यांना दम्याचा आजार जडला होता. पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये शिकत असताना आगरकर आपला एकुलता एक सदरा रात्रीच्या वेळी धुऊन वाळवत व तो दिवसा वापरत असत. इ.स.१८८१ मध्ये ते एम. ए. पास झाले. इ.स.१८८० मध्ये पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलची स्थापना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. इ.स.१८८१-१८८९ या काळात ते 'केसरी'चे संपादक होते. **जॉन स्टुअर्ट मिल, ऑगस्ट कांट आणि हर्बट स्पेन्सर यांच्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा पगडा आगरकरांच्या विचारांवर आहे.** इ.स.१८८८ ते ९५ या काळात ते 'सुधारक' या पत्राचे संपादक होते. अंगयष्टी उंच, सडपातळ, काटक, पाणीदार पण खोल डोळे, रुंद कपाळ, खालच्या ओठापर्यंत येणाऱ्या मिशा, काळी पगडी, पांढरा अंगरखा, शुभ्र काठाचे उपरणे, हातात काठी ही आगरकरांची बाह्य ओळख होती.

सरकारी नोकरीऐवजी स्वतंत्र शाळा काढून शिक्षक म्हणून नोकरी स्वीकारण्यात आगरकरांचा एक वेगळा ध्येयवाद होता. इंग्रजी व तत्त्वज्ञान हे विषय ते शिकवत. **त्यांचे एक शिष्य ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगरकर लिहितात,** 'आगरकरांची राहणी साधी होती. निगर्वीवृत्ती, शिकवण्याची कळकळ, विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान करण्याची उत्सुकता, विद्यार्थ्यांविषयी प्रेम इत्यादी गुण ज्यांच्या प्रत्ययास आले त्यांना आगरकरांविषयी प्रेम व आदर वाटल्यावाचून राहत नाही.' न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक, सुप्रिटेंडेंट, फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्राध्यापक व नंतर प्राचार्य हा त्यांचा शैक्षणिक प्रवास होय. इंदौरचे संस्थानिक शिवाजीराव होळकर यांनी त्यांना महिना ५०० रु. दरमहाच्या नोकरीची ऑफर दिली; पण ती त्यांनी नाकारली.

आगरकरांच्या पत्नी यशोदाबाई ह्या पूर्ण अशिक्षित होत्या. पण आगरकरांनी त्यांना शिकवले. यशोदाबाई जुन्या संस्कारात, रुढी परंपरेत वाढलेल्या होत्या. नव्या विचारांची चर्चा आगरकर पत्नीसोबत करीत असत. यशोबादाबाईच्या धार्मिक समजुतीबद्दल आगरकरांनी पत्नीचा कधी अपमान केला नाही. आगरकरांना एक कन्या व दोन मुले अशी ३ अपत्ये होती. पतीच्या अकाली निधनामुळे यशोदाबाईंनाच मुले वाढवायची जबाबदारी पार पाडावी लागली. पतीच्या निधनानंतर यशोदाबाईनी काही आठवणी लिहिल्या होत्या व त्या स्त्री मासिकात १९३८ साली प्रकाशित करण्यात आल्या होत्या. त्या आठवणीनुसार कुळाचार, कुळधर्म, सोवळे ओवळे याबाबत गो. ग. आगरकर कधी लक्ष घालत नसत. पण यशोदाबाई मात्र देवधर्म करत. आगरकरांना मृत्यूची चाहूल लागली होती. मृत्युपूर्वीच काही

महत्त्वाच्या सूचना त्यांनी यशोदाबाईंना दिल्या होत्या. आगरकरांना त्यांच्या मृत्यूपूर्वीच डेक्कन एज्युकेशन सोसायटीमधील प्राचार्य वामनराव आपटे श्री. धारप, श्री. तेलंग, वासुदेवराव केळकर या सहकाऱ्यांचे मृत्यू झाल्याने व टिळकांनी संस्थेचे त्यागपत्र दिल्याने डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या कारभाराचा भार त्यांच्यावर पडला होता.

शालेय जीवनापासूनच आगरकरांना सरकारी नोकरीचा तिटकारा होता. पण सरकारी नोकरी न करता आयुष्यभर समाजासाठी कार्य करण्याचे त्यांनी ठरविले होते. समाजाच्या उन्नतीसाठी काही तरी करावे असे विचार विद्यार्थी दशेतच त्यांच्या मनात येत होते. प्रामुख्याने शिक्षणप्रसारासाठी कार्य करण्याचे त्यांनी विद्यार्थीदशतेच ठरविले होते. त्यातच टिळकांसारखा स्नेही, मित्र त्यांना मिळाला. शिक्षणाबरोबरच सामाजिक सुधारणेचा विचारही विद्यार्थीदशेतच आपल्या मित्रांना त्यांनी बोलून दाखवले. विद्यार्थी दशेतच त्यांनी प्रचंड वाचन केल्यामुळे व चिंतन केल्यामुळे सामाजिक व शैक्षणिक कार्याची व्यापक व भक्कम बैठक तयार झाली होती. लेखणीप्रमाणे त्यांना वाणीची देणगी मिळाली. एका वक्तृत्व स्पर्धेत तर त्यांना त्यावेळी ५० रु. बक्षिस मिळाले होते. 'वऱ्हाड समाचार' या साप्ताहिकाला लेख पाठवून त्यातून त्यांना पैसा (५ रु. एका लेखास) मिळे. त्यावरच त्यांचे शिक्षण झाले. त्यांचे धाकटे मामा दत्तोपंत भागवत यांनी त्यांना विद्यार्थी दशेत मदत केली. त्यांचा स्वभाव निग्रही होता. त्यांचे शिक्षक रावबहादूर महाजनी आगरकरांना एकदा काही कामामुळे वर्गात येण्यास आगरकरांना उशीर झाला तेव्हा ते म्हणाले, 'तुमच्या हातून काहीच कार्य होणार नाही असेच रखडत पडायचे तुम्ही' त्यावर आगरकर ताडकण म्हणाले, 'आपल्यासारखाच एम. ए. होईन, तरच नावचा आगरकर' कॉलेजातील शिक्षणाचा खर्च झेपेना तेव्हा त्यांना आप्तजन म्हणत, 'कॉलेजचा नाद सोड' तेव्हा गो. ग. आगरकर म्हणत, 'मी डिग्री घेतल्यावाचून राहणार नाही.'

आगरकरांना फक्त ३९ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यापैकी पहिली २२-२३ वर्षे ही विद्यार्जनात गेली. दारिद्र्याशी त्यांना सतत सामना करावा लागला. देशसेवेचे एक माध्यम म्हणून त्यांनी शिक्षणाच्या कार्याला वाहून घेतले होते. आगरकरांना हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या तरी 'मला जे सांगावयाचे होते ते सांगितले आहे' असे समाधान आयुष्याच्या शेवटी त्यांना लाभले होते. पण **त्यांच्या पत्नी यशोदाबाई आगरकरांच्या आठवणीत लिहितात,** 'आपल्या कार्यासाठी त्यांनी जिवाचे रान केले. घरप्रपंच, पैसाअडका, मानमरातब यांची पर्वा केली नाही... पण त्यांच्या श्रमांचे व्हावे तसे चीज झाले नाही. मला रात्रंदिवस वाटे, लोकांकरिता म्हणून सतत तडफडणाऱ्या या जिवाचे मोल लोकांनी नीट केले नाही.' ४ जुलै १८१६ च्या **'केसरी'त टिळकांनी लिहिले,** 'आगरकरांची योग्यता एम. ए. होण्यात, ग्रंथ वाचनात वा लेखनपटूत्वातच नाही. धैर्य, स्वार्थत्याग, मनोनिग्रह, तत्त्वनिष्ठा हे गुण त्यांच्या अंगी होते. या सर्व सद्गुणांचा त्यांनी लोकोपयोगार्थ उपयोग केला.' बुद्धिप्रामाण्य, व्यक्तिस्वातंत्र्य, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, ऐहिक जीवनसमृद्धी

आणि विज्ञाननिष्ठा ही त्यांची जीवनमूल्ये होती. लोकशिक्षण व लोकांच्या संमतीनेच समाजात परिवर्तन घडवून आणले पाहिजे असे ते म्हणत. त्यांच्या लेखनात समाजहिताची तळमळ होती. त्यांनी अज्ञान, अंधश्रद्धा, दांभिकता यास विरोध केला.

**ग्रंथसंपदा :-**

'केसरी' व 'सुधारक' या पत्रांतील लेखांशिवाय आगरकरांनी इतरही लेखन केले आहे.

१) डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस (१८८२)

२) विकारविलसित (हॅम्लेटच्या नाटकाचे मराठी भाषांतर) (१८८३)

३) वाक्यमीमांसा (व्याकरणविषयक पुस्तक)

इ.स.१८९२-९५ या काळात आगरकर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य होते. मार्च १८९५ ला कॉलेजच्या तेव्हाच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले; पण कामाचा व्याप व दम्याचा आजार यामुळे १० जून १८९५ रोजी आगरकरांचे निधन झाले. आगरकरांचा ३९ व्या वर्षी झालेला मृत्यू ही महाराष्ट्राच्या दृष्टीने दुर्दैवी घटना म्हणावी लागेल.

## २) आगरकरांचे सामाजिक विचार (Social Thoughts of G. G. Agarkar) :-

शाळेच्या माध्यमातून लोकशिक्षणास मर्यादा आहेत म्हणून वृत्तपत्रे चालवून लोकशिक्षण करावे असे टिळक, चिपळूणकर, नामजोशी व आगरकर यांना वाटू लागले. विशेषतः आगरकरांना लिहिण्याची फार हौस होती. तेव्हा वर्तमानपत्र काढून काहीतरी देशसेवा करावी, असे न्यू इंग्लिश स्कूलच्या सर्व संचालकांना वाटू लागले. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी साप्ताहिक टिळकांच्या व ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' हे मराठी साप्ताहिक आगरकरांच्या संपादकत्वाखाली सुरू झाले. आगरकर 'केसरी'चे ७ वर्षे संपादक होते. 'केसरी'त प्रामुख्याने आगरकरांचे लिखाण प्रसिद्ध होऊ लागले. विषयांची विविधता, विचारांचा स्पष्टपणा व स्वतंत्रपणा यामुळे 'केसरी' लोकप्रिय झाला. सरकारवर टीका करणे, लोकांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देणे व जुन्या सामाजिक चालीरीती, रूढी यांची लोकांना जाणीव करून देऊन नवा बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करणे ही 'केसरी'ची उद्दिष्टे होती. संपादक या नात्याने आगरकरांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक अशा विविध विषयांवर लिखाण केले. ब्रिटिशांच्या राज्यपद्धतीवर त्यांनी भरपूर टीका केली. आगरकरांचे टिळकांशी सामाजिक प्रश्नांबाबत मतभेद झाले व आगरकरांनी शेवटी 'केसरी'चे संपादकपद सोडून दिले.

इ.स.१८८८ मध्ये 'सुधारक' हे साप्ताहिक आगरकरांनी सुरू केले. 'केसरी'च्या विशिष्ट सामुदायिक धोरणाचा अडसर, जो आगरकरांच्या विचारात होता तो आता

राहिला नाही. समाजातील दोषस्थळे लोकांपुढे आणणे, ते दूर करण्यासाठी उपाय सुचवणे व युरोपियन समाजव्यवस्थेत अनुकरण करण्यासारखे काय आहे हे दाखविणे हा 'सुधारक' काढण्यामागचा हेतू होता हे सुधारकच्या पहिल्या अंकातच स्पष्ट केले होते. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' या ब्रीदाला अनुसरून आगरकरांनी 'सुधारक' चालविले. 'सुधारक' पत्राद्वारे आगरकरांनी तत्कालीन समाजातील प्रचलित चालीरीती, रूढी, आचार-विचार, व्यवहारातील ढोंग व दांभिक वर्तनावर बोट ठेवले. न. चिं. केळकर यांच्या मते, 'सुधारका'तील मते अप्रिय होती. त्यामुळे 'केसरी'इतका त्याचा प्रसार झाला नाही. तरीही आगरकर जिवंत असेपर्यंत 'सुधारक'चा खप ३००० प्रती आठवड्यास एवढा होता. **'सुधारक' पत्रात सामाजिक प्रश्नांवरच का भर दिला जातो? यासंबंधी आगरकरांनी म्हटले होते,** 'राजकीय, धार्मिक, सामाजिक, व्यापारी या सर्व विषयांवर सर्वांची लेखणी, बुद्धी सारखीच चालणे अशक्य आहे. आम्हाला सामाजिक सुधारणांवर विशेष भर द्यावा वाटतो. त्यामुळे सामाजिक विषयाची प्रधानता सुधारकांत असते.' 'सुधारक' पत्रातून आगरकरांनी सामाजिक प्रश्नांना अग्रक्रम दिला असला तरी भारताचे होणारे आर्थिक शोषण, व्यापाराची तत्कालीन स्थिती, व्यापार नाशाची कारणे, इंग्रजी शासनात होणारे जुलूम व अन्याय, राष्ट्रसभा, हिंदू-मुस्लिम तंटे, करपद्धती, भारतीय कलांचे पुराणत्व वगैरे विविध विषयांवरही लिखाण केले आहे.

'केसरी' व 'सुधारक' चे अंक तपासले असता आगरकरांनी संयम कोठेही सोडला नाही असे दिसते. तोल कोठेही गेला नाही. व्यासपीठावरून उभे राहून आगरकर बोलत आहेत, असे त्यांचे लिखाण वाचताना वाटते इतका आवेग, आवेश व बोलकेपणा त्यांच्या भाषेत होता. मूळ वाक्य व त्यास अनेक लहान लहान वाक्यांची साथ देऊन वाचकांच्या मनावर आशय ठसवण्याचे त्यांचे लेखणीचे तंत्र होते. समर्पक दृष्टांत व रूपके, उपहासात्मक विनोद, ओघवती भाषा ही त्यांच्या लेखनकलेची काही वैशिष्ट्ये होत. आशय, विचारसरणी व शैली या सर्वच दृष्टींनी आगरकरांच्या वृत्तपत्रीय लिखाणास मराठी निबंध वाङ्मयाच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

**सामाजिक सुधारणांचे तीन मार्ग आगरकर सांगतात.**

१) अनिष्ट सामाजिक रूढी, परंपरा, स्त्री दास्य इत्यादीचे दुष्परिणाम लोकांच्या मनात ठसवून त्यापासून लोकांना परावृत्त करणे.

२) लोकशिक्षणाच्या माध्यमातून आधुनिक विचार स्वीकारण्याची लोकांना सवय लावणे.

३) कायद्याचा मार्ग निषिद्ध न मानता प्रसंगानुरूप त्याचा अवलंब केला पाहिजे.

आहे असे त्यांनी म्हटले होते. पाश्चात्य शिक्षणात व त्या कल्पनांत मनुष्यसुधारणेच्या अत्यावश्यक तत्त्वांचा समावेश झाला आहे अशी त्यांची खात्री होती.

हिंदू समाजातील तत्कालिक स्थिती पाहता आगरकरांना वाटे, आम्ही पारतंत्र्यालाच लायक आहोत. **'गुलामांचे राष्ट्र'** या त्यांनी लिहिलेल्या एका विस्तृत लेखातील खालील उतारा आगरकरांच्या मनातील उद्वेग स्पष्ट करतो. ते लिहितात, 'राष्ट्राचे ऐक्य होण्यास लागणारा एकतरी गुण आम्हांत भरपूर आहे का? धैर्य नाही, उत्साह नाही, बळ नाही, ज्ञान नाही, तर्क नाही, उद्योग नाही, कला नाही, खरा देशाभिमान नाही, खरी धर्मश्रद्धा नाही, खरे बोलण्याची किंवा खरे आचरण करण्याची सवय नाही.' हिंदू लोकसंख्या भेकड, निरुद्योगी, उत्साहशून्य व तारतम्य न बाळगणारी आहे याबद्दल ते खंत व्यक्त करतात. देशात स्वतंत्रपणे विचार करणारे लोक निघाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही असे त्यांचे ठाम मत होते. आगरकर म्हणतात की, 'स्वभूमीत, स्वलोकांत, स्वधर्मात आणि स्वविचारांत राहून अविचारी व अज्ञान देशबांधवांच्या निंदेस किंवा छळास न भिता, त्यांच्याशी कधी भांडून, कधी युक्तिवाद करून, कधी लाडीगोडी लावून अथवा सामर्थ्य असल्यास कधी त्यांना दटावून त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रीती, खरी बंधुता, खरा देशाभिमान, खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे.'

'सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल काळ : सांप्रत काळ' या शीर्षकाच्या दोन लेखात त्यांनी आपली गृहस्थिती व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे व तो करण्यास अत्यंत अनुकूंल काळ सांप्रत काळ आहे. चांगली राजकीय स्थिती ही चांगल्या गृहस्थितीचे फळ आहे. सबब, या दोहोंच्या सुधारणेस प्रथम लागले पाहिजे असे म्हटले होते. राजकीय, धार्मिक व सामाजिक सुधारणांपैकी प्रथम कोणती होते व करावी याविषयी कितीही मतभेद असले तरी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास आज आम्हास जितका अनुकूल काळ प्राप्त झाला आहे तितका पूर्वी कधीच झाला नव्हता; आमचे सांप्रत पारतंत्र्य हेच सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास काही अंशी अनुकूल झाले आहे, असे त्यांचे प्रतिपादन होते.

**२) जातिभेद व अस्पृश्यता :-** हिंदूंतील जन्मसिद्ध उच्चनीचभाव, स्पृश्यास्पृश्य कल्पना यास आगरकरांनी विरोध केला होता. 'जातिसंस्थेची उपयुक्तता संपलेली आहे, एवढेच नव्हे तर जातिसंस्थेमुळे आपले अतोनात नुकसान होत आहे. जातिभेद हे आपल्या अवनतीचे एक कारण आहे. जातिधर्माच्या भ्रामक कल्पनेमुळे विद्या, कला व शास्त्रे यांची वाढ खुंटली. जातिभेदामुळे आमची भूतदया, आमचे बंधुप्रेम, आमची उदारता, आमची धर्मबुद्धी, आमची परोपकारिता, आमचे विचार यांचे क्षेत्र मर्यादित झाले आहे' असे आगरकर लिहितात. जातिभेदामुळे धर्मविचारांत आचारांत मतभेद उत्पन्न झाले. जातिभेदामुळे अन्नव्यवहार, विवाह वगैरेंच्या संबंधाने गैरसोय निर्माण झाली. जातिभेदामुळे प्रवास करणे कठीण झाले. जातिभेदांमुळे आपला देशाभिमान

संकुचित झाला आहे, जातिभेद हे ईश्वरनिर्मित आहेत हे समजणे अंधश्रद्धेचे द्योतक आहे इत्यादी तोटे आगरकरांनी मांडले.

जातिभेदांची निर्मिती, व्याप्ती, त्यातील बदल व त्याचे परिणाम इत्यादीची मीमांसा करून जाती निर्मूलनासाठी विचारपूर्वक कृती करण्याचे आवाहन त्यांनी केले होते. पुणे नगरपालिकेच्या ताब्यातील सार्वजनिक हौदावर पाणी भरण्याच्या प्रश्नावरून ब्राह्मण व शूद्र यांच्यात तंटा उद्‌भवला तेव्हा त्यांनी ब्राह्मण वर्गास इशारा दिला की, 'ब्राह्मण्यरूप इमारत ढासळणार आहे.' आगरकर भविष्य वर्तवतात की, 'विद्येचा जसजसा अधिक प्रसार होईल तसतसे शूद्रादी वर्गास हल्लीचे वैषम्य अधिकाधिक टोचू लागून ते नाहीसे करण्यास ते जोराने प्रयत्न केल्याशिवाय राहणार नाहीत.' अस्पृश्यतेच्या रूढीतील अन्याय, अविचारीपणा आगरकरांनी स्पष्टपणे दाखवून दिला होता. व्यापार धंदा, सरकारी नोकऱ्या, आगगाडीचा प्रवास यामुळे जातिबंध शिथिल होत आहेत असे त्यांना वाटे. एका लेखात ते लिहितात, 'ब्राह्मणांना हे कसे समजत नाही की, आपल्या अंगात कोणत्याही प्रकारचे त्राण, योग्यता व अधिकार न राहिल्यामुळे ब्राह्मण्य करण्याचे, बहिष्कार घालण्याचे वा कोणाला वाळीत टाकण्याचे दिवस आता गेले आहेत. उलट अस्पृश्यांकडूनच ब्राह्मण बहिष्कृत होण्याचा संभव आहे.'

अस्पृश्य जाती या हिंदू समाजाच्या घटक आहेत. अस्पृश्यांबाबत बंधुभाव असेल तरच समाज बलवान व कर्तृत्वशाली बनेल. शाळांतून महारांना आपल्या मांडीस मांडी लावून बसता आले पाहिजे. महारांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणांची एकच पंगत बसली पाहिजे असे आगरकरांनी लिहिले होते. पुण्याच्या नगरपालिकेच्या हौदावर 'ब्राह्मणा'करिता, 'शूद्रांकरिता' अशा पाट्या लावलेल्या असत. पण हा प्रकार त्यांना चुकीचा वाटत होता. ३० जानेवारी १८९३ च्या 'सुधारक'च्या अंकात आगरकरांनी 'म्युनिसिपल हौद व ब्राह्मण्यांवर गदा' हा लेख लिहून त्यात शिवाशिवीच्या व सोवळ्याओवळ्याच्या खुळचट कल्पनावर हल्ले केले. सार्वजनिक हौदावर व पाणवठ्यावर पाणी भरण्याचा आणि स्नान करण्याचा सर्वांना सारखाच अधिकार आहे, असे आगरकरांनी 'सुधारकां'मध्ये म्हटले होते. महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींच्या दुःस्थितीबद्दलही आगरकरांनी 'सुधारक' पत्रात आवर्जून लिहिले. जाती-जातीत रोटीबेटी व्यवहार होण्यासाठी जातिभेद नाहीसे झाले पाहिजेत, असे आगरकरांनी म्हटले होते. जन्माधिष्ठित जातिव्यवस्था व धर्मसंस्था यामुळे व्यक्तीचा विकास कसा खुंटला आहे, याचे वर्णन आगरकर करतात. वर्णव्यवस्थेमुळेच समाजाला अनेक दोष पत्करावे लागले, असे आगरकर म्हणत. प्रत्येक मनुष्य जन्मतः स्वतंत्र आहे ही तात्त्विक भूमिका आगरकरांची होती.

जाती-जातीतील विषमता योग्य वेळेत दूर केली नाही तर समाजातील एक वर्ग बंड करून उठेल, असा इशारा आगरकरांनी दिला होता. तो त्यांच्या द्रष्टेपणाची

साक्ष देतो. **आगरकर म्हणतात,** 'अस्पृश्य वर्गास इंग्रजी अमलाने ज्ञानाची दारे खुली होऊन त्यांचे डोळे उघडले असल्यामुळे 'ब्राह्मणास भूदेव मानून त्यांची सेवा करणे हाच तुमचा धर्म आहे' हा उपदेश यापुढे अर्थातच त्यांना मानवणार नाही व ते ब्राह्मणाच्या भूदेवत्वाविरुद्ध बंड केल्यावाचून राहणार नाही.' जातिभेदाच्या निर्मितीबद्दल सविस्तर चर्चा करून आगरकरांनी जातिनिर्मूलनासाठी विचारपूर्वक क्रांती करण्याचे आवाहन केले आहे. जातिभेद आमच्या प्रगतीच्या आड येत आहे व सामाजिक समतेच्या तत्त्वांशी तो विरोधी असल्याने आपण त्यावर हत्यार उपसले पाहिजे. हिंदुस्थानातील जन्मसिद्ध वर्णव्यवस्था व जातिभेद या कितीही जुन्या संस्था असल्या तरी त्या आता टिकणे शक्य नाही व इष्टही नाही, अशी आगरकरांना खात्री होती. स्पृश्य समाज आणि अस्पृश्य लोक यांच्या रंगात, शरीररचनेत काहीही फरक नाही तर त्यात भेदभाव का केला जावा? असा प्रश्न ते विचारतात. कोण्या एका काल्पनिक समाजपुरुषाच्या मुखातून ब्राह्मण जन्मले आणि पायापासून शूद्र जन्मले हे तरी कोणी ठरवले? हे पक्षपाती शास्त्र आहे. ते झुगारून दिले पाहिजे असे आवाहन ते करतात. माणसाची श्रेष्ठता त्याच्या जन्मावरून नव्हे तर गुणकर्मावरून ठरावी हा उदात्त व उदारमतवादी विचार त्यांनी मांडला.

**सुधारणेचा आगरकरांना अभिप्रेत अर्थ :-**

ज्या देशात निरनिराळ्या वर्गातील लोकांत स्त्री-पुरुषांतील अंतर दूर करण्याचे प्रयत्न झपाट्याने होत आहेत. जेव्हा असमतेची (Inequality) परमावधी होते तेव्हा घनघोर राज्यक्रांती होऊन समाज लयास जातात, धुळीस मिळतात किंवा त्यात अभूतपूर्व स्थित्यंतरे होतात असे आगरकरांचे मत होते. समाजात सत्ता व संपत्ती यांची समान विभागणी हेच समाजसुधारणेचे खरे ध्येय आहे असावे, सर्वांस सारखे, होईल तितके सारखे सुख मिळण्याची व्यवस्था होत जाणे म्हणजे सुधारणा होत जाणे, असा सुधारणेचा अर्थ आगरकरांना अभिप्रेत होता. तुम्हाला एकंदर समाजात कोणत्या सुधारणा पाहिजेत, असा प्रश्न एकाने विचारला असता आगरकरांनी जातिभेद मोडणे, धर्मसुधारणा करणे, मदिरा-मांस यांचे सेवन बंद करणे, साक्षरता व व्यक्तीस चरितार्थ चालविण्याकरिता व्यवसाय करण्याची पात्रता वाढविणे या गोष्टींवर भर दिला होता.

**३) ब्रिटिश लोकांच्या गुणांचे अनुकरण करा; पण अंधानुकरण नको :-**

ब्रिटिश राज्य व इंग्रजी विद्या याचे भारतीय समाजजीवनावर जे परिणाम झाले त्याचीही आगरकरांनी मीमांसा केली आहे. सरकारी नोकऱ्या बहुधा जातीचा विचार न करता केवळ गुण (शिक्षण) पाहून देण्याचे ठरले असल्यामुळे जातिभेदाचे माहात्म्य मोडले आहे. इंग्रजी विद्येने व इंग्रजी अमलाने आम्हास विचारस्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्य दिले. पूर्वी जातीच्या आधारे समाजाचे वर्गीकरण होई; पण ब्रिटिश अमलात प्राप्ती व संपत्तीच्या आधारे समाजाचे वर्गीकरण होत आहे हे परिणाम आगरकर नमूद करतात. 'इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत?' या लेखात त्यांनी कचेऱ्यांतून

अतितत्परतेने व चोख काम करणे, बेताबेताचे खाणे, कपड्यातील नीटनेटकेपणा, जातिभेदांचा अभाव इत्यादींचा उल्लेख करून आगरकर म्हणतात, 'आमच्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणी असे अनेक गुण आहेत की, त्यांचे अनुकरण आम्ही होता होईल तितके केलेच पाहिजे.' ब्रिटिश लोकांत उद्योगीपणा, नियमितपणा, शोधकता, व्यापारीवृत्ती इत्यादी गुण आहेत व या गुणांचा भारतीयांनी स्वीकार केला पाहिजे, असा आग्रह आगरकर म्हणतात.

हिंदुस्थानातील दारिद्र्याचे आगरकरांना अत्यंत दुःख वाटत होते. या देशाची प्रगती व्हावी, विकास व्हावा, हीच खरी त्यांची तळमळ होती. त्यांनी 'वाचाल तर चकित व्हाल' या निबंधात आकडेवारी देऊन आपला देश किती गरीब आहे हे निदर्शनास आणले.

पाश्चात्त्य देशांतील सुधारणेची मूलतत्त्वे आपण ग्रहण केली पाहिजेत असे आगरकरांनी म्हटले असले तरी परकीयांचे अंधानुकरण करणे त्यांना मुळीच मान्य नव्हते. पाश्चात्त्य शिक्षणामुळे नव्या विचारांचे स्वागत करणाऱ्या व्यक्तींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे; पण अशा सुधारकांची वेगळी जात करणे अविचाराचे होईल असे आगरकरांचे मत होते.

**४) समाजोत्कर्षाचा मुख्य घटक 'व्यापारवृद्धी' हा होय :-** आगरकरांनी हे मत स्वतंत्र लेखात मांडले. 'आम्हा निरुद्योगी हिंदू लोकांची उद्योगी इंग्रज लोकांशी गाठ पडली आहे. तेव्हा आम्ही त्यांच्यासारखा उद्योग करण्यास राजी झाले पाहिजे. आमचे भावी स्वातंत्र्य, आमचे भावी निरंतर दास्य सर्वथैव आमच्या उद्योगावर अवलंबून आहे' असे मत मांडून सुशिक्षित वर्ग ३०/३५ रु. च्या नोकरीच्या मागे लागला आहे याबद्दल ते खंत व्यक्त करतात. आगरकर प्रश्न विचारतात की, कष्टाने संपादिलेल्या विद्येचा असा सवंग विक्रय करावयाचा काय? विद्यार्जनाने विकसित झालेली मने स्वतंत्र धंदे करण्याकडे लावाल तर तुम्हास अन्नाची किंवा मानाची काय वाण पडणार आहे? पण खांदा देऊन काम करण्याची व दुसऱ्याचे गुलाम न होता स्वतःच्या करामतीवर चरितार्थ संपादन करण्याची धमक आता कोठे राहिली आहे?'

**५) विभक्त कुटुंब पद्धतीचा पुरस्कार :-** आगरकरांनी स्त्री-दास्य विमोचनाचा प्रश्न अधिक आग्रहाने मांडला. स्त्री-शिक्षण, बालविवाह, संमती याचा प्रश्न, विधवा पुनर्विवाहाची समस्या, विधवांची दुःस्थिती, केशवपन, सती स्त्रियांचे अर्थार्जन इत्यादी सर्व बाबतीत आगरकरांनी रोखठोक बुद्धिवादी भूमिका घेतली होती. संयुक्त कुटुंबामुळे स्त्री-दास्य अधिक बळकट होते म्हणून आगरकर विभक्त कुटुंबपद्धतीचा पुरस्कार करतात. स्त्री सुधारणेशिवाय समाजाची प्रगती शक्यच नाही असे त्यांचे मत होते.

**६) केशवपनाच्या प्रथेवर हल्ला :-** केशवपनाची प्रथा ही अत्यंत अन्यायी, अमंगल व निंद्य आहे असे त्यांचे मत होते. आगरकरांचे एक सहकारी व फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य वामन शिवराम आपटे यांच्या विधवा पत्नीने जेव्हा केशवपन केले

तेव्हा आगरकर अत्यंत दुःखी झाले होते. आपल्या मृत्यूनंतर पत्नी केशवपन करणार नाही अशी शपथ त्यांनी त्यांच्या बायकोकडून घेतली होती. केशवपन प्रथेच्या संदर्भात अमुक वयाच्या आत मुळीच वपन करू नये व त्यापुढेही ते स्त्रियांच्या मर्जीविरुद्ध होऊ नये यासाठी कायदा करावा असे ते म्हणत. 'दीनबंधू'त न्हावी लोकांनी केशवपनाची प्रथा बंद करावी असा जो लेख प्रसिद्ध झाला तेव्हा त्या पत्राचे व लेखकाचे आगरकरांनी अभिनंदन केले होते.

**७) बालविवाहावर आगरकरांची टीका :-** आगरकरांच्या मते, स्त्रियांच्या दुःस्थितीचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे बालविवाहाची पद्धत होय. आमची प्रजा क्षीण, अल्पायुषी उत्साहशून्य व भेकड आहे, मानसिकदृष्ट्या दुबळी आहे याचे कारण बालविवाह होय. अपत्य संगोपन व प्रपंच चालविणे ही कामे व्यवस्थित होण्यासाठी बालविवाह टाळले पाहिजेत अशी मते आगरकरांनी आग्रहाने मांडली. बालविवाहाच्या रूढीमुळेच बालवैधव्य व केशवपनाच्या क्रूर व राक्षसी आपत्ती स्त्रियांवर येतात. म्हणून बालविवाहाची पद्धत कायद्याने बंद करावी असा आगरकरांचा आग्रह होता. बालविवाहाचे संततीवर, समाजावर व स्त्रियांवर काय परिणाम होतात; बालविवाह हे अर्थशास्त्रदृष्ट्या, व्यावहारिकदृष्ट्या व स्त्रीच्या आरोग्याच्या दृष्टीने कसे हानिकारक आहेत, हे आगरकरांनी 'केसरी'तील अनेक लेखांतून मांडले होते. **आगरकरांच्या मते,** बालविवाहामुळे स्वातंत्र्यहानी, शक्तिहीनता, धाडसीपणाचा अभाव, मंदबुद्धी इत्यादी दुर्गुण आपल्या ठायी आले आहेत. विवाहांतर्गत एकापाठोपाठ होणाऱ्या बाळंतपणामुळे स्त्रीचा जन्म वाया जातो, पुरुषांना त्याचे सोयरसुतक नसते.' प्रौढ विवाह अमलात येण्यासाठी बालविवाहविरोधी लोकांच्या सह्या घेऊन वर्तमानपत्रात प्रसिद्ध कराव्यात असे आवाहन त्यांनी केले होते. आगरकरांच्या काळात गाजत असलेल्या संमतीवयाच्या बिलास आगरकरांनी पाठिंबा दिला होता. लग्न म्हणजे काय, हेच माहीत नसते अशा वयात लग्ने लावल्याने व अल्पवयातच संसाराचा भार पडल्याने बालविवाह यशस्वी होत नाहीत; बालविवाह अत्यंत विघातक आहेत असे आगरकरांनी लिहिले. सुशिक्षित तरुणांनी महाराष्ट्र बालविवाह निषेधक मंडळी या नावाची संस्था स्थापावी, या मंडळीची संख्या २००० असावी, या सभासदांनी फंड उभारला म्हणजे बालविवाहाच्या विरोधात आवश्यक व उपयुक्त गोष्टी करता येतील असे आगरकरांना वाटत होते. बालविवाहविरोधी कार्यात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पुढाकार घ्यावा असे त्यांनी आग्रहाने सांगितले.

**८) स्वयंवर पद्धतीचा आग्रह :-** 'स्वयंवर' या शीर्षकाच्या लेखात 'जी स्वयंवरे नाहीत त्या सर्वास आम्ही बालविवाह समजतो! ज्याचे त्याने लग्न करणे म्हणजे स्वयंवर! एकाने दुसऱ्याशी लग्न करणे म्हणजे बालविवाह' असे आगरकरांनी म्हटले होते. भारतात एकेकाळी स्वयंवर पद्धत प्रचलित होती हेही ते स्पष्ट करतात. स्वयंवर पद्धतीमुळे स्त्रियांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊन ती सध्यापेक्षा जास्त सुखी होईल, असे मत आगरकरांनी आपल्या अनेक लेखांतून मांडले. १४ वर्षांखालील मुलीचे लग्न

न करण्याबद्दल पालकांना शपथ घ्यावयास लावणे हा पर्याय ते सुचवतात. 'अज्ञानपणी आईवडिलांनी केलेले लग्न मला पसंत नाही' अशी तक्रार कोर्टाकडे आली तर कोर्टाने ते लग्न रद्द करावे अशीही त्यांची सूचना होती. बालविवाहामुळे आमच्यातील सद्‌गुणांचा ऱ्हास झाला आहे असे आगरकर म्हणत. बालविवाह हा आमच्या देशाला एक महाक्षयरोग लागला आहे, या भारतभूमीच्या तोंडाला काळिमा फासणारा हा अपकीर्तीचा कज्जल करंडक आहे, तेव्हा जागोजाग सभा भरवून थोड्या वर्षांच्या आत बालविवाहाची प्रथा समूळ नष्ट करण्याचे आवाहन आगरकरांनी केले होते. बालविवाहाची पद्धत अत्यंत घातक व दुष्ट आहे, बालविवाहामुळे १६-१७ वर्षांतच मुले बाप बनल्यामुळे त्यांची तारुण्यातील हिंमत व महत्त्वाकांक्षा जागच्या जागी जिरून जाते, असे आगरकर म्हणत. मुलीचे लग्न १०-१२ वर्षांच्या आत व मुलांची १६-१७ वर्षांपूर्वी होणार नाही यासाठी कायदा करण्याची गरज आगरकर प्रतिपादन करतात.

**९) स्त्रियांची व पुरुषांची वेशभूषा यासंबंधी आगरकरांची मते :-** 'आमच्या स्त्रियांचे पेहराव' या शीर्षकाचे दोन लेख आगरकरांनी लिहिले होते. उपयुक्तता व दर्शनीयता हे दोन गुण डोळ्यांपुढे ठेवले पाहिजेत, असे आगरकरांनी स्त्री वेशभूषेबाबत म्हटले होते. स्त्रियांनी चोळीच्या वरती जाकीट वापरावे. त्यामुळे त्यांच्यात कार्यक्षमता येईल व वारंवार पदर सावरण्यात जो वेळ जातो व त्रास होतो तो वाचेल. स्त्रियांनी जोडे / बूट वापरावेत; थंडीत व प्रवासात हातमोजे व पायमोजे वापरावेत, उन्हात व पावसात स्त्रियांनी छत्री वापरावी आदी सूचना त्यांनी केल्या होत्या. (आज हे सर्व प्रत्यक्ष व्यवहारात आले आहे.)

'आम्हा पुरुषांचा पेहराव' या शीर्षकाचे ६ लेख आगरकरांनी लिहिले होते. धोतराऐवजी पायजमा वापरावा, रुमालाऐवजी इंग्रजी टोपी वापरावी असेही ते म्हणतात. पारंपरिक पोकळ अंगरखाही टाकाऊ आहे, असेही त्यांना वाटत होते. पुरुषांच्या पेहरावातही त्यांचा भर उपयुक्तता व दर्शनीयता यावर होता.

**१०) स्त्रियांच्या दागिन्यांच्या हौसेवर टीका :-** 'अलंकार मीमांसा' व 'दागिन्यांचा सोस' या शीर्षकाचे लेख आगरकरांनी लिहिले होते. श्रीमंती दाखविण्याचा दागिने हा एकमेव मार्ग नाही; त्यापेक्षा चांगले घर बांधा किंवा चांगले घर भाड्याने घ्या, चांगली वस्त्रे वापरा असे आगरकर लिहितात. दागिने चोरी जातात, दागिन्यात पैसा गुंतून पडतो, दागिने तयार करताना सोनार लबाडी करतो, विक्री करतानाही कमी किंमत येते, दागिन्यांमुळे चोऱ्या व खून होतात, सोन्याची झीज होते इत्यादी अनेक दोष त्यांनी लिखाणात मांडले. देशाचे बरेच धन सोन्यात अडकून पडले आहे. तेव्हा खरे दागिने घालण्यापेक्षा खोटे दागिने वापरा, दागिने खरेदी करण्यापेक्षा तो पैसा बँकेत ठेवा म्हणजे व्याज येईल असेही ते सुचवतात.

**११) सक्तीच्या वैधव्यावर टीका :-** विधवांना ज्या नरकप्राय यातना सहन कराव्या लागतात त्यासंबंधी 'शहाण्यांचा मूर्खपणा' या लेखात आगरकरांनी आपले विचार

मांडले आहेत. 'ब्राह्मण विधवा ही हिंदू लोकांच्या अविचाराची, विपरीत व रानटी धर्मश्रद्धेची व त्यांच्या हाडास खिळलेल्या त्यांच्या अन्यायीपणाची खूण आहे' असे आगरकरांचे मत होते.

**१२) विधवांच्या पुनर्विवाहाचा आग्रह :-** विधवांच्या पुनर्विवाहाबाबत विष्णुशास्त्री पंडित यांनी जे प्रयत्न केले त्यांचा गौरव आगरकर करतात. स्त्रियांप्रमाणे पुरुषांनीही पत्नीच्या मृत्यूनंतर पुनर्विवाह का करू नयेत. स्त्रीला एक व पुरुषाला एक न्याय का? स्त्रीचा पुनर्विवाह हा अपवित्र व अनीतिमूलक मानणे चूक आहे, असे आगरकर म्हणतात. पुनर्विवाहामुळे विधवेला समाजात प्रतिष्ठा मिळेल, तिच्या मनातील हीनत्वाची भावना कमी होईल, भ्रूणहत्येसारखे प्रसंग टळतील असे ते म्हणतात. न्यू हायस्कूल (पुणे) येथील शिक्षक रामभाऊ जोशी यांच्या विधवा बहिणीचा पुनर्विवाह झाला तेव्हा 'सुधारक' पत्रातून त्यांनी रामभाऊ जोशींचे कौतुक केले.

**१३) प्राथमिक शिक्षणाची सक्ती हवी :-** प्राथमिक शिक्षणाचा सक्तीच्या शिक्षणात अंतर्भाव झाला पाहिजे, आपल्या मुलामुलींना जे प्राथमिक शिक्षण देणार नाहीत त्यांना दंड करावा, अशी सूचनाही आगरकर करतात. मुलींना शिक्षण द्यावे, मुलांच्या बरोबरीने द्यावे आणि जे मुलांना दिले जाते तेच शिक्षण मुलींना द्यावे ही आगरकरांची भूमिका त्याकाळी अनेकांना धक्कादायक होती. आगरकरांनी ज्या तर्कशुद्ध पद्धतीने सहशिक्षणाचा पुरस्कार केला तो महत्त्वाचा होता. युरोपातील देश, अमेरिकेत प्राथमिक शिक्षणाची सक्ती करणारे कायदे होते; पण रशियात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा नसल्याने तेथील प्रजा अडाणी राहिली हेही त्यांनी तुलनात्मकदृष्ट्या स्पष्ट केले. प्राथमिक शिक्षण देणे हे सरकारचे आवश्यक कर्तव्य आहे, अशी आगरकरांची स्पष्ट भूमिका होती. प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी कोणावरही पडो, ते दिले आहे किंवा नाही हे सरकारने पाहिलेच पाहिजे असेही ते म्हणतात. भारताच्या संदर्भात **शिक्षणाचे महत्त्व सांगताना ते म्हणतात,** 'मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्र्य, पारतंत्र्य, धर्मसंबंधाने वेड्याखुळ्या समजुती, जातिभेदासाखे हजारो पिढ्या चालत आलेले जबरदस्त निर्बंध इत्यादीकांनी गांजून-पिळून अथवा चिरडून जाऊन मरणोन्मुख झालेल्या देशात शिक्षणावाचून दुसरा तरणोपाय आहे असे आम्हास वाटत नाही.'

'अनाथाचा वाली कोणी नाही' या लेखात आगरकरांनी विद्यापीठांचा कला शाखेचा त्रैवार्षिक शिक्षणक्रम अत्यंत कष्टावह झाला आहे, अशी तक्रार केली आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात देशी भाषांचा विचार झाला पाहिजे, अशी आगरकरांची भूमिका होती. 'देशी भाषा युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात घातल्याच पाहिजेत व ज्यांना जे विषय त्यांच्याद्वारे शिकण्याची इच्छा असेल त्यांना ते शिकविण्याची परवानगी दिली पाहिजे' अशा अर्थाचे शेकडो अर्ज विद्यापीठाच्या कार्यालयांकडे पाठविण्याचे आवाहन त्यांनी केले होते. देशी भाषा हे विद्यापीठीय शिक्षणाचे माध्यम असावे हा विचार आगरकरांनी १२५ वर्षांपूर्वीच मांडला हे विशेष होय.

[illegible]

१४) [illegible]

१५) [illegible]

[illegible]

[illegible]

**१६) बालिका - वृद्ध विवाहावर टीका :-** आगरकरांनी त्यांच्याकाळी ५० वर्षापेक्षाही अधिक वयाचा माणूस व १२ वर्षांची मुलगी असे विवाह झालेले पाहिले होते. अशा प्रकारच्या विवाहात वृद्ध पतीच्या मृत्यूनंतर विधवा स्त्रीला अतोनात कष्ट व यातना भोगाव्या लागतात हे त्यांनी स्पष्ट केले. तसेच अशा प्रकारच्या विवाहात पुरुषांच्या कामवासनेपासून स्त्रीला मृत्यूही येतो. 'समज नाही हेच' या लेखात त्यांनी बाला-वृद्ध विवाहावर ताशेरे ओढले आहेत. विवाहकाळाची मर्यादा वाढविण्यासंदर्भात कायदा करण्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला होता. मुलीचे संगोपन करून तिला वय प्राप्त झाल्यावर तिच्या संमतीने योग्य वर पाहून स्वाधीन करावे असे आगरकर म्हणतात.

**१७) स्त्रियांना स्वातंत्र्य हवे :-** 'मराठमोळा' व 'मराठमोळ्यांची पुरवणी' या शीर्षकाचे दोन लेख आगरकरांनी 'सुधारक' पत्रात लिहिले होते. मराठे लोकांत पुरुषांप्रमाणे स्त्रियांस उघडपणे वागण्याचा जो प्रतिबंध आहे, त्यास 'मराठमोळा' हा शब्द ते वापरतात. या चालीत चांगुलपणाचा भाग मुळीच नाही असे आगरकर म्हणतात. स्त्रीपक्षाची बाजू उचलून धरताना ते म्हणतात, 'पुरुषांनी बायका या केवळ प्रजोत्पादनाची हिंडती फिरती यंत्रे आहेत असे समजू नये. बायकांना का बुद्धी नाही, का मन नाही, का रुची नाही, का बरेवाईट समजण्याची अक्कल नाही? त्यांच्यात पुरुषांपेक्षा काय कमी आहे? पुरुषांना ज्याप्रमाणे सुखदुःखे होतात त्याप्रमाणे त्यांनाही होतात. मग त्यांनाच या भयंकर अज्ञातवासात कशासाठी ठेवावे?' स्त्रियांना घरात कोंडून ठेवल्याने जे व्हावे ते निम्मे वेगाने होत आहे. म्हणूनं स्त्रियांना गोषात न ठेवता पुरुषांप्रमाणे त्यांना प्रशस्तपणे हरएक शास्त्रात, कलेत, व्यवहारात निष्णात केले पाहिजे' असे आगरकर म्हणतात. घरकाम करण्यात पुरुषांनी कमीपणा मानू नये. धुणीभांडी, स्वयंपाक, दळणवळण ही कामे पुरुषांनीही करावीत असे ते सुचवतात. एकंदरीत स्त्री पुरुषांमधील स्वामी-सेवक संबंध नष्ट करून समानतेच्या व संमतीच्या पायावर या संबंधाची फेरउभारणी करण्यास आगरकरांनी महत्त्व दिले होते. पण आगरकरांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाची एक मर्यादा नमूद करावी लागेल व ती म्हणजे उच्च जाती व वर्णापलीकडच्या बहुजनांमधील स्त्रियांच्या प्रश्नांची फारशी दखल घेताना ते दिसत नाहीत.

**१८) मद्यपानाचे दुष्परिणाम :-** 'दारूबाजी' या लेखात आगरकरांनी दारूमुळे झोप मोडते, पैसा जातो, अब्रू जाते, विविध आजार होतात हे स्पष्ट करून दारूचा खप वाढत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली. अफूपेक्षा दारूचे व्यसन शेकडो पट वाईट आहे. दारूबंदीसंदर्भात प्रयत्न न केल्यास हे व्यसन वाढेल. या व्यसनाचा नाश करण्यासाठी ब्रिटिशांकडे पाहून उपयोग नाही. कारण तेच पक्के दारूबाज आहेत. दारूच्या व्यसनाची दुष्ट कळी खुडून टाकण्याचे त्यांनी आवाहन केले होते. ब्रिटिश सरकार दारूच्या दुष्परिणामांकडे दुर्लक्ष करते याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली होती.